


# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत जनहितार्थ माहिती सादर

## नागरिकांसाठी आजारांबद्दल मराठीत माहिती २०२५



श्री. प्रकाश आबिटकर
माननीय मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण महाराष्ट्र राज्य

# डेंग्यू आजारांबद्दल माहिती



डेंग्यू हा एडिस इजिप्ती डासांद्वारे पसरणारा विषाणूजन्य आजार आहे. पावसाळ्यात याचा प्रादुर्भाव अधिक होतो. खाली नागरिकांसाठी उपयुक्त माहिती दिली आहे:



## डेंग्यू म्हणजे काय ?

**डेंग्यू हा विषाणूजन्य ताप आहे जो एडिस इजिप्ती डासांच्या चाव्यामुळे होतो. डास सकाळी व संध्याकाळी अधिक सक्रिय असतात.**



## ? डेंग्यूची लक्षणे कोणती असतात ?

उत्तर: - तीव्र ताप (104°F पर्यंत)

- डोकेदुखी, डोळ्यांच्या मागे वेदना
- सांधेदुखी, स्नायूदुखी
- मळमळ, उलट्या
- त्वचेवर पुरळ किंवा लालसर चट्टे
- थकवा, भूक मंदावणे

## ? डेंग्यू किती प्रकारचा असतो ?

उत्तर: - सौम्य डेंग्यू ताप ( DF)

- हेमोरॅजिक डेंग्यू ताप ( DHF)
- डेंग्यू शॉक सिंड्रोम - गंभीर स्थिती ज्यात रक्तस्त्राव व रक्तदाब कमी होतो

## ? डेंग्यूची चाचणी कोणती ?

उत्तर: - ब्लड टेस्ट (NS1 Antigen, IgM/IgG Antibody)

- प्लेटलेट्स आणि WBC तपासणी
- RT-PCR चाचणी गंभीर प्रकरणात केली जाते



**? उपचार काय असतात ?**

उत्तर: - तापासाठी पॅरासिटामॉल
- भरपूर द्रवपदार्थ ( ORS, फळांचा रस)
- गंभीर स्थितीत IV fluids आणि रक्त चढवणे
- Aspirin आणि Ibuprofen टाळावेत - रक्तस्त्रावाचा धोका वाढतो

**? डेंग्यू टाळण्यासाठी काय करावे ?**

उत्तर: - घरात आणि आजूबाजूला पाणी साचू देऊ नका
- मच्छरदाणी , डासनाशक वापरा
- सकाळ-संध्याकाळ लांब बाहीचे कपडे घाला
- खिडक्यांना जाळ्या लावा

**? कधी डॉक्टरांकडे जावे ?**

उत्तर: - ताप ३ दिवसांपेक्षा जास्त टिकल्यास
- उलट्या , रक्तस्त्राव , पुरळ दिसल्यास
- लहान मुले , वृद्ध , गर्भवती महिलांमध्ये लक्षणे दिसल्यास